# मालेगाव महानगरपालिका,मालेगाव
## एकात्मिक आरोग्य व कुंटुब कल्याण सोसायटी,मालेगाव
### आरोग्य अधिकारी कार्यालय

राष्ट्रीय शहरी आरोग्य अभियानांतर्गत मालेगाव महानगरपालिका,मालेगाव भरती प्रक्रिया ठोक मानधन पध्दतीने खालील पदांसाठी पात्र उमेदवारांकडुन अर्ज मागविण्यात येत आहे.

| Sr.No | Name Of Post | No.of Post | Educational Qualification | Age Criteria | Remuneration In per Month |
|---|---|---|---|---|---|
| 1 | समुदाय समन्वंयक Community Coordinator **महिला** | 33 | 10 th Pass | 21 to 45 | Rs.5000/ |

1) सदर पदाना मंजुर आराखडा सन 2024-25 वर्षाकरीता म.शासनाकडुन निधी प्राप्त आहे.
2) उपरोक्त पदास शासनाने पदे नामंजुर केल्यास कोणतीही पुर्व सुचना न देता उमेदवारांची सेवा संपुष्टात येईल.
3) जाहीरातील पदे राज्य शासनाची नियमित पदे नसुन निव्वळ कंत्राटी स्वरुपातील पदे आहेत सदर पदावर कायमपणाचा हक्क राहणार नाही तसेच या पदांसाठी शासनाने सेवा नियम लागु नाही तसेच अर्जदाराला शासकीय नियमित सेवेते सामवुन घेणे किंवा शासनामार्फत सेवा संरक्षण किंवा त्यांसबंधी दावा करण्याचा अधिकार राहणार नाही.
4) अर्जदार हा संबंधित पदासाठी शारीरीक व मानसिक दृष्टया सक्षम असावा तसेच अर्जदारविरुध्द कोणताही फौजदारी गुन्हा दाखल झालेला नसावा.
5) उपरोक्त कंत्राटी पदांकरीता दरमहा एकत्रित रु.5000/- मानधन देण्यात येईल.
6) जाहीरातील रिक्त पदांच्या संख्येत बदल होऊ शकतो तसेच रिक्त ठिकाणामध्ये बदल होऊ शकतो यबाबतचे सर्व अधिकारी मा.आयुक्त तथा प्रशासक सो मालेगाव महानगरपालिका,मालेगाव यांनी राखुन ठेवले आहेत.
7) अनुभवी व उच्च शैक्षणिक (12 वी पास) अर्हता धारकास प्राधान्य दिले जाईल.
8) निवड यादीतील गुणक्रमांकाचे आधारे प्राधान्यक्रमाने पदस्थापना दिली जाईल.त्याबाबत उमेदवारांना कुठल्याहरी दबावतंत्राचा वापर केल्यास सदर उमेदवाराची निवड रद्द करण्यात येईल.
9) शासकीय,निमशासकीय तसेच खाजगी असणा-या अनुभवाचा विचार निवड प्रक्रियेत करण्यात येईल.
10) अर्जदाराला कंत्राटी कालावधीत सोईनुसार ठिकाण बदलवुन मिळण्याची मागणी करता येणार नाही.
11) भरती प्रक्रिया स्थगीत करणे/रदद करणे/पदभरती प्रक्रियेस बदल करण्याचे सर्व अधिकार मा.आयुक्त तथा प्रशासक सो मामनपा यांचे स्तरावर राखीव ठेवण्यात आलेले आहेत.याबाबत कोणालाही दावा करता येणार नाही.
12) उमेदवारांने विहीत नमुन्यातील अर्ज व आवश्यक कागदपत्रांच्या छायाकिंत सत्यप्रतिसह आपले अर्ज राष्ट्रीय आरोग्य अभियान, आरोग्य विभाग, जुने आयुक्त कार्यालय, मालेगाव महानगरपालिका, मालेगाव येथे दि.१६/१२/2024 ते दि.२३/१२/2024 रोजी सांयकाळी 05.00 वाजता शासकीय सुटीचे दिवस वगळुन व्यक्तीश सादर करावेत.
13) सदर निवड प्रक्रिया पुर्ण झालेनंतर भविष्यात जर एखादया ठिकाणी कर्मचारी यांनी राजीनामा दिलेमुळे जागा रिक्त झालेस प्रतिक्षा यादीवरील उमेदवारास नवीन भरती प्रक्रिया न करता नियुक्ती आदेश दिले जातील.
14) अर्जाचा नमुना हा जाहीरातीसोबत प्रसिध्द निकाल जाहीर करण्यात आलेला असुन सदरील नमुन्याप्रमाणे अर्ज नसल्यास उमेदवारांचा अर्ज ग्राहय धरण्यात येणार नाही.
15) या पदाकरीता 21 वर्षे पुर्ण झालेली,महिला पात्र करणेत येईल.
16) दिलेल्या अतिजोखीमच्या भागात राहणा-या उमेदवाराला प्राधान्य देण्यात येईल.
17) सदर पदाची नियुक्ती मालेगाव शहराच्या पुर्व भागासाठी 11 नागरी आरोग्य केंद्रासाठी आहेत.
18) हिंदी व उर्दु भाषा बोलणे व लिहीता येणे आवश्यक आहे तसेच त्यांनाच पात्र करणेत येईल.
19) सदर पदासाठी मुलाखत घेण्यात येणार नाही याची नोंद घ्यावी.
20) उपरोक्त पदांकरीता निवड प्रक्रिया ही प्राप्त अर्जाच्या संख्येनुसार अर्जाची छाननी करुन गुणानुक्रमे यादी तयार करण्यात येऊन त्यामध्ये शैक्षणिक पात्रतेचे 70% गुण उच्च शिक्षिणचे 20 व शासकीय/निम शासकीय/खाजगी अनुभवासाठी जास्तीत जास्त 10 असे एकुण 100 गुणांनुसार उमेदवाराची अंतिम निवड करण्यात येईल.
21) सदर पदा बाबतची माहिती मालेगाव महानगरपालिका,मालेगाव संकेत स्थळावरती प्रसिध्द करणेत येईल याची नोंद घ्यावी.

खालीलप्रमाणे आवश्यक असलेल्या मुळ कागदपत्राच्या साक्षाकिंत केलेल्या प्रती अर्जाच्या नमुन्याला जोडाव्यात.
1)शैक्षणिक अर्हतेबाबतची प्रमाणपत्रे व गुणपत्रिका 2) शाळा सोडल्याचा/जन्मतारीख दाखला 3)पासपोर्ट आकाराचे 2 फोटो 4)संबंधित पदाचा शासकीय/खाजगी अनुभव असलेले प्रमाणित केलेले अनुभव प्रमाणपत्र इत्यादी आवश्यक आहे.

आयुक्त तथा प्रशासक
मालेगाव महानगरपालिका,मालेगाव

Scanned with OKEN Scanner